स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
**मुख्य कार्यालय विरार**
यशवंत नगर, विरार (प)
ता. वसई, जि. पालघर - ४०१३०३

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. वविशम/सा.प्र./३३५/२०२५
दिनांक – १०/१२/२०२५

# परिपत्रक

विषय :- अभ्यागतांना भेटण्यासाठी दिवस व वेळ निश्चित करणे बाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१०१०/१३०/प्र.क्र.३७/१०/१८(र.व.का.)दिनांक ४ जून,२०१० (प/५)

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२४/१८ (रवका)दिनांक २७ मे, २०१३ (प/७)

३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१९३/नवि २० दिनांक ०३ जूलै, २०१५ (प/११)

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९/१८ (र.व.का.)दिनांक २ फेब्रूवारी, २०१६ (प/१५)

५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०३/१८ (र.व.का.)दिनांक २८ मार्च, २०२३ (प/१९)

६) उप आयुक्त सामान्य प्रशासन जावक क्र.वविशम/साप्र./४३/२०२५ दिनांक ०५/०२/२०२५ रोजीचे परिपत्रक. (प/५)

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये अभ्यागतांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे समाधान करण्याच्या दृष्टीने अधिकारी व क्षेत्रिय पातळीवरील अधिकाऱ्यांनी जनतेच्या भेटीसाठी विवक्षित दिनांक व वेळ राखून ठेवण्याच्या दृष्टीने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील अधिकारी (आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त, उपसंचालक नगररचना, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता, सहाय्यक आयुक्त, प्रभारी सहाय्यक आयुक्त, वैद्यकिय आरोग्य अधिकारी तसेच उर्वरित इतर सर्व विभाग प्रमुख तसेच प्रभाग समिती स्तरावरील अधिकारी, सहाय्यक आयुक्त, प्रभारी सहाय्यक आयुक्त) यांना अभ्यागतांनी भेटण्याचा दिवस व वेळ वरील शासन निर्णयानुसार आपल्या महानगरपालिकेकरिता पुढे नमुद केलेल्या रचनेनुसार वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | अभ्यागतांना भेटीचे वार | अभ्यागतांना भेटीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त/प्र.सहाय्यक आयुक्त | सोमवार व मंगळवार | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० |
| २ | उप-आयुक्त/विभाग प्रमुख, मुख्यालय | बुधवार व गुरुवार | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० |
| ३ | आयुक्त /अतिरिक्त आयुक्त | शुक्रवार | दुपारी ३.०० ते सायं. ५.०० |

वरील प्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी प्रभाग समिती स्तरावर सहाय्यक आयुक्त/प्र.सहाय्यक आयुक्त तसेच मुख्यालयातील उप-आयुक्त आणि विभाग प्रमुख इ. अधिकाऱ्यांनी सदर कार्यक्रमाला व्यापक प्रसिध्दी देऊन अभ्यागतांच्या शंकांचे निरसन होईल ही बाब गांर्भियाने घ्यावी. सदर बाबतीत अधिकाऱ्यांनी सुध्दा वेळेचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन तक्रारींचा वेळीच निपटारा होऊन त्याच तक्रारी वारंवार प्रशासनाकडे येणार नाहीत हयाबाबत दक्षता घ्यावी जेणेकरुन अभ्यागतांच्या प्रश्नांना / तक्रारींना न्याय देणे शक्य होईल.

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

प्रत- माहितीसाठी

१) मा.आयुक्त सो.
२) अतिरिक्त आयुक्त (दक्षिण/उत्तर)
३) उपसंचालक, नगररचना विभाग
४) शहर अभियंता व कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग)
५) उप आयुक्त (सर्व)
६) सहाय्यक आयुक्त/प्रभारी सहाय्यक आयुक्त (सर्व)
७) वैद्यकिय आरोग्य अधिकारी
८) विभाग प्रमुख (सर्व)

// नोटिस बोर्डवर प्रसिध्दीसाठी